# प्रेस नोट

पुणे महानगरपालिका
कर आकारणी व कर संकलन विभाग

पुणे महानगरपालिका कर आकारणी व कर संकलन विभागातील मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी हे Election SIR–2026 या विशेष निवडणूक कामकाजासाठी सुनावणीसाठी पुन्हा नियुक्त करण्यात आले आहेत. त्यामुळे विभागातील नियमित कामकाजावर तात्पुरता परिणाम होत असून नागरिकांना मालमत्ता कराशी संबंधित सेवा, अर्ज व इतर कामकाजामध्ये विलंब होत आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन पुणे महानगरपालिका प्रशासन नागरिकांची मनःपूर्वक दिलगिरी व्यक्त करत आहे.

उपलब्ध मनुष्यबळाच्या माध्यमातून नागरिकांना शक्य तितक्या कार्यक्षम व तत्पर सेवा देण्यासाठी विभागाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. Election SIR–2026 चे कामकाज पूर्ण झाल्यानंतर विभागाचे नियमित कामकाज पूर्ववत गतीने सुरू करण्यात येईल. नागरिकांनी या तात्पुरत्या परिस्थितीत विलंबाने काम झाल्यास प्रशासनास सहकार्य करावे व संयम बाळगावा, ही नम्र विनंती.

31.8.26

– कर आकारणी व कर संकलन विभाग
पुणे महानगरपालिका